“महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित या कंपनीशी संबंधित प्रकरणे/बाबी” हा विषय माहिती तंत्रज्ञान विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांकः साप्रआ-१०१८/प्र.क्र.४४/१९

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ०४ एप्रिल, २०१८

संदर्भ -

१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांकः मातंत्र-३७००/ (१३२/२०००)/भाग-ड/ तांशि-३, दिनांक ०६.०६.२००१

२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांकः एमकेसीएल-२०१६/ (२४९/१६)/तांशि-५, दिनांक ०५.०१.२०१८

प्रस्तावना :-

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या दि.०६.०६.२००१ च्या शासन निर्णयान्वये “महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित” या कंपनीची स्थापना करण्यात आली. सदर कंपनीशी संबंधित प्रकरणे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून हाताळण्यात येत होती. तद्नंतर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथे नमूद केलेल्या दि.०५.०१.२०१८ च्या शासन निर्णयानुसार “महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित या कंपनीशी संबंधित प्रकरणे/बाबी” हा विषय सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतरित करण्याच्या निर्णय घेण्यात आला. सदर विषय सामान्य प्रशासन विभागाच्या माहिती तंत्रज्ञान कार्यासनाकडे हस्तांतरित करण्याची बाब विचाराधीन होती.

२. “महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित” या कंपनीमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा, तसेच या उपक्रमांचा राज्य शासनाच्या कामकाजात उपयोग करण्याच्या दृष्टीने आढावा घेण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०३.२०१८ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितशी संबंधित सर्व बाबींचे राज्य शासनाच्या स्तरावरील समन्वयन माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत करण्यात यावे, असे निदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितशी संबंधित सर्व बाबींचे राज्य शासनाच्या स्तरावरील समन्वयन सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील माहिती तंत्रज्ञान कार्यासनामार्फत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सदर कंपनीशी संबंधित सर्व प्रकरणे/बाबी यापुढे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत हाताळण्यात येतील तसेच सर्व बाबींचे राज्य शासनाच्या स्तरावरील समन्वयन माहिती

तंत्रज्ञान विभागामार्फत करण्यात येईल. सदर विषय हा प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अंतर्गत ठेवण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयास अनुसरुन आवश्यक ते सविस्तर पूरक आदेश, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०६.०६.२००१ च्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञान विभागाने निर्गमित करावेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०४१३१९२४७५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Namdeo Rankhambe

Digitally signed by Sunil Namdeo Rankhambe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9287ff6ecd6be6d97bc1f64cb2e9f2e983afc349644d5b96e4035adeb15b9ddd, serialNumber=3e3af05b91531a4ac12a8e4e7f4950594f44d95731488a5c3e512583364cdfca, cn=Sunil Namdeo Rankhambe
Date: 2018.04.04 13:23:01 +05'30'

(सु.ना. रणखांबे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. मा.राज्यमंत्री (साप्रवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
३. अपर मुख्य सचिव (सेवा)/ प्रधान सचिव(माहिती तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. सर्व सह /उप/ अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
७. अवर सचिव (का.३९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
८. सर्व कार्यासने, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
१०.निवडनस्ती.